अपील अधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय
शिवाजीनगर पुणे ४११००५
दूरध्वनी क्र. ०२०-२५५०११२३
ई मेल **aadmcgeneral@punecorporation.org**
अपिल क्र. ०१/२०१९
जा.क्र उआ (सा.प्र.)/६३५७ दि. १८/०१/२०१९

## अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन) पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय

अपील क्रमांक : पुणे मनपा/अ.प्रा.उआ(सा.प्र.)/अपिल/०१/२०१९

श्री संतोष रामदास मेमाणे
शिक्षण विभाग (प्राथमिक)
पुणे मनपा, कै. भाऊसाहेब शिरोळे भवन,
जुना तोफखाना, शिवाजीनगर, पुणे ५

------------------- अपिलार्थी

### विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी,
आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका

## माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(१) अन्वये अपिल

श्री संतोष रामदास मेमाणे पत्ता शिक्षण विभाग (प्राथमिक) पुणे मनपा, कै. भाऊसाहेब शिरोळे भवन, जुना तोफखाना, शिवाजीनगर, पुणे ५ (यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधिले जातील) यांनी जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांचेकडे दि. १३.११.२०१८ रोजी अर्ज करून "शिक्षक बदली प्रकरण जानेवारी २०१८ ते आजपर्यंत शिक्षकांच्या आंतरजिल्हा बदली प्रकरणात लाचलुचपत विभाग, पुणे यांचे कार्यालयाने चौकशी करून पुढील कार्यवाही करणेसाठी मा. महापालिका आयुक्त यांना पाठविलेले अहवालाची प्रत मिळणे बाबतची माहिती मागितली होती.

अपिलार्थी यांचे मुळ अर्जातील माहिती बाबत जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांनी जा. क्र. जमाअ/आस्था/८५३० दि. १९.१२.२०१८ अन्वये अर्जास उत्तर दिलेले आहे.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अर्जावरील दिनांक | अर्ज प्रत्यक्ष प्राप्त झाल्याचा दि. | माहिती द्यावयाचा अंतिम दि. | अपिलार्थीस उत्तर/माहिती पाठविल्याचा दि. | विलंब दिवस |
| १३.११.२०१८ | १५.११.२०१८ | १४.१२.२०१८ | १९.१२.२०१८ | ५ |

अपिलार्थी यांचे जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांनी दिलेल्या उत्तराने समाधान न झाल्याने त्यांनी अपील क्र. ०१/२०१९ चा अपील अर्ज दि. ०३.०१.२०१९ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

| अपिल अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अपील अर्जाचा दिनांक | अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दि. | अपील दाखल करावयाचा अंतिम दि. | अपील अर्ज मुदतीत दाखल केला आहे का? | अपील अर्जाच्या विलंब बाबत निवेदन दिले आहे का? |
| ०३.०१.२०१९ | ०३.०१.२०१९ | १८.०१.२०१९ | होय | विलंब नाही. |

सदर प्रकरणी दि. ११.०१.२०१९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आलेली होती. सदर सुनावणीस अपिलार्थी **श्री संतोष रामदास मेमाणे** पत्ता शिक्षण विभाग (प्राथमिक) पुणे मनपा, कै. भाऊसाहेब शिरोळे भवन, जुना तोफखाना, शिवाजीनगर, पुणे ५ व जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे मनपा यांचे प्रतिनिधी **श्री मनोहर डावखर** हुद्दा उप अधीक्षक हे उपस्थित होते.

## विवेचन

अपिलार्थी **श्री संतोष रामदास मेमाणे** पत्ता शिक्षण विभाग (प्राथमिक) पुणे मनपा, कै. भाऊसाहेब शिरोळे भवन, जुना तोफखाना, शिवाजीनगर, पुणे ५ यांनी माहिती मिळाली नसल्याचे सांगितले व आपले लेखी म्हणणे सादर केले व जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे मनपा यांचे प्रतिनिधी **श्री मनोहर डावखर** हुद्दा उप अधीक्षक यांनी जावक क्रमांक जमाअ/आस्था/८५३० दि. १९.१२.२०१८ अन्वये अर्जास उत्तर असे प्रतिपादन केले.

## आदेश

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी,** आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांनी अर्जदार यांचे अर्जास उत्तर दिलेले आहे. अपिलार्थी यांची विनंती अमान्य करण्यात येत आहे. अपील क्र. ०१/२०१९ निकाली काढण्यात येत आहे.

(अनिल मुळे)
अपिलीय प्राधिकारी
उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका